**<u>उलटतपास प्रतिवादींकरीता विधीज्ञ श्री.बी.बी. भाकरे यांच्या वतीने शपथेवर सुरु</u> -**

३१. माझ्या गुरूचे नाव अनिल पंतबाबा महानूभाव असे आहे. साक्षीदार स्वतः सांगतात की, त्यांचे महंती नंतरचे नाव पंतबाबा महानूभाव असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, अनिल पंतबाबा महानूभाव उर्फ पंतबाबा महानूभाव यांच्या व्यतिरिक्त माझे दुसरे कोणतेही गुरु नाही. हे म्हणणे खरे नाही की, ट्रस्टचे नाव नोंदवितांना दावा मिळकत-१ब या मिळकतीच्या ७/१२ उता-यावर प्रतिवादी क्र.३ यांचे नाव होते. हे म्हणणे खरे आहे की, ट्रस्टच्या शेडयूलमध्ये नाव लावण्याकरीता आम्ही दावा मिळकतीचे उतारे सादर केले होते. हे म्हणणे खरे नाही की, ट्रस्टच्या शेडयूलमध्ये नाव लावण्याकरीता आम्ही प्रतिवादी क्र.३ यांची समंती/परवानगी घेतली नव्हती.

**<u>प्रश्न</u>** - तुमच्या म्हणण्याप्रमाणे तुम्ही प्रतिवादी क्र.३ यांची परवानगी घेतली होती ?

**<u>उत्तर</u>** - प्रतिवादी क्र.३ यांची परवानगी घेण्याचा प्रश्न येत नाही.

३२. हे म्हणणे खरे आहे की, दि.२३/०८/२०२३ रोजी दावा मिळकतींची जी परिस्थिती होती त्या तारखेनंतर त्या परिस्थितीमध्ये आम्ही बदल केले. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.३ यांनी आमच्या विरुध्द नि.दि.दा.क्र.२८०/२०२२ हा दावा दाखल केला आणि त्या दाव्यामध्ये न्यायालयाने दावा मिळकतींची आहे ती परिस्थिती कायम ठेवण्याबाबत आदेश पारीत केले. हे म्हणणे खरे आहे की, पंतबाबा ही गादी कारंजेकर कुळातील आहे. हे म्हणणे खरे आहे की, डॉ.राजधर आरध्ये यांनी शतकपूर्व श्री.कारंजेकर कुळातील करारनामा व देवपुजेचा अबाब लिहिलेला असून तो खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की, श्री.कारंजेकर कुळातील वंश परंपरागत गादी दर्शविणारा कोणताही कागद आम्ही दाखल केला नाही.

३३. हे म्हणणे खरे नाही की, धर्मदाय आयुक्तालयातील अधिका-यांना हाताशी धरुन आम्ही ट्रस्टच्या शेडयूलमध्ये दावा मिळकतींची बेकायदेशीरित्या नोंद करु घेतली. महानूभाव पंथात दिक्षा घेतांना साधकाला गुरुकडून वस्त्र व भिक्षापात्र दिले जाते. हे म्हणणे खरे आहे की, साधकाचा अधिकार हा फक्त वस्त्र व भिक्षापात्र याच्यावरच असतो. हे म्हणणे खरे नाही की, ट्रस्टची नोंद करण्यापूर्वी प्रस्तूतचा दावा दाखल होता.

**<u>प्रश्न</u>** - तुमच्या म्हणण्याप्रमाणे जर दावा दाखल करण्यापूर्वी ट्रस्टची नोंद झाली होती तर तुम्ही तुमच्या वैयक्तीक क्षमतेमध्ये हा दावा का दाखल केला ?

**<u>उत्तर</u>** - दावा दाखल करतेवेळेस मिळकतींच्या उता-यावर ट्रस्टचे नाव लागलेले नव्हते.

हे म्हणणे खरे आहे की, माझी नियूक्ती करतेवेळेस कविश्वर कुळाचार्य श्री.कारंजेकर बाबा हे अखिल भारतीय महानूभाव परिषदेचे अध्यक्ष होते. हे म्हणणे खरे नाही की, रुढी व परंपरेनूसार मंहतांना अधिकार प्राप्त होतात त्या अनुषगांने आम्ही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. ट्रस्ट या नात्याने वादीपणात समाविष्ट होतांना आम्ही धर्मदाय आयुक्तांची परवानगी घेतली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१८ पासून मी पंथामध्ये महंत या नात्याने धर्माचा प्रचार आणि प्रसार करतो हे दाखविण्याकरीता मी कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. माझ्या म्हणण्याप्रमाणे पंथामध्ये महंत या नात्याने धर्माचा प्रचार आणि प्रसार करतो हे दाखविण्याकरीता मी दावा मिळकतीमध्ये केलेल्या बांधकामाचा नकाशा दाखल केला आहे.

३४. हे म्हणणे खरे आहे की, बेलापूर येथील फेर क्र.७५८८ मंजूर होण्याकामी मी महसूल दप्तरी मी इंदूबाईचा एकूलताएक शिष्य म्हणून वारस आहे अश्या स्वरुपाचा अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे नाही की,

प्रतिवादी क्र.३ यांना त्रास देण्याच्या उद्देशाने आम्ही हा खोटा दावा दाखल केला आणि मी पुराव्याचे खोटे प्रतिज्ञापत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2025.12.10 17:24:39 +0530

(आशिष बि. मरलेचा)

दिनांक १०/१२/२०२५

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
श्रीरामपुर, जि.अहमदनगर